जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २७.०९.२०२५**

पोलीस मित्र

ठाणे पोलीस आयुक्तालयाकडुन पोलीस मित्र या नावाचे ॲप दिनांक. २०/०९/२०२५ पासुन सुरु करण्यात आले आहे. पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढविणे, सामाजिक सलोखा, कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारीवर नियंत्रण इ. साठी नागरिकांचा स्वयंस्फुर्तीने सक्रिय सहभाग मिळविण्यासाठी हे एक पाऊल टाकण्यात आले आहे. सामान्य नागरिक, विदयार्थी, सामाजिक कार्यकर्ते, माजी सैनिक, व्यावसायिक हे समाजातील विविध घटक पोलीस कामकाजात स्वयंप्रेरणेने उपलब्धतेनुसार सहभाग नोंदवणार आहेत.

प्रत्येक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशासन यांच्या मार्फतीने याबाबत समन्वय व पडताळणी केली जाणार आहे. पोलीस मित्रांची खालीलप्रमाणे भुमिका असणार आहे.

१. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाच्या अशा विविध बंदोबस्तमध्ये पोलीसांना मदत.
२. वाहतूक नियंत्रण, विविध सामाजिक उपक्रम, शांतता/मोहल्ला कमिटी यामध्ये सक्रीय सहभाग.
३. महिला, ज्येष्ठ नागरिक व मुलांच्या सुरक्षेसाठी जनजागृती.
४. नशाविरोधी, दहशतवादविरोधी मोहीमांमध्ये भाग घेणे.

या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीची जोपासना, पोलीस व नागरिक यांच्यात विश्वासाचे बंध आणि भयमुक्त ठाणे निर्मितीस प्रोत्साहन मिळणार आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयातर्फे समाजातील सर्व जनतेला आवाहन करण्यात येत आहे की सर्वांनी या उपक्रमात उस्फुर्तपणे सहभागी व्हावे. यासाठी आपल्या नजीकच्या पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर